# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९९०९३
ई-मेल: moh@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि/९९३०/२०२५-२६ दिनांक:-२६/०८/२०२५

प्रति,
जनसंपर्क अधिकारी,
जनसंपर्क विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :-** **प्रधानमंत्री आयुष्यमान भारत (महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना) "को ब्रँडेड आयुष्यमान कार्ड निर्माणाची विशेष मोहिम दिनांक १६ ऑगस्ट २०२५ ते ३१ ऑगस्ट २०२५" दरम्यान राबविणेबाबत**

**संदर्भ :-** **मा. सचिव (२), महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे दि. १३/०८/२०२५ रोजीचे निर्देश पत्र.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, "को ब्रँडेड आयुष्यमान कार्ड निर्माणाची विशेष मोहिम दिनांक १६ ऑगस्ट २०२५ ते ३१ ऑगस्ट २०२५" मा. सचिव यांच्याकडून निर्देश प्राप्त झाले आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आरोग्य केंद्र, आयुष्यमान आरोग्य मंदिर व सर्व प्रभाग कार्यालय येथे आयुष्यमान कार्ड निर्माणाची विशेष मोहिम दि. २८/०८/२०२५ ते दि. ३०/०८/२०२५ दरम्यान राबविण्यात येणार असून आपल्या आधिपत्याखालील सर्व शासकीय आणि निमशासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच त्यांचे कुटुंबीय हे सुद्धा राज्याच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत रुपये ५ लक्ष प्रती कुटुंब प्रतिवर्ष आरोग्य विषयक लाभ मिळण्याग पात्र आहेत. यासाठी सर्व शासकीय आणि निमशासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी स्वतःचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे तसेच आप्तस्वकीयांचे आयुष्मान कार्ड निर्माण प्रक्रिया करण्यात येणार आहे.

सदर कार्ड निर्माण करण्यासाठी लाभार्थी Beneficiary Login द्वारे स्वतःच स्वतःचे आयुष्मान कार्ड तयार शकतो आणि प्रिंट घेऊ शकतो. यासाठीची क्रमवार कार्यपद्धती, पोर्टल, मोबाईल ॲप यांची माहिती मो पाठविण्यात येत आहे. यास व्यापक प्रसिध्दी द्यावी. त्याशिवाय आशा सेविका, स्वस्त धान्य दुकानाला आणि आपले सरकार सेवा केंद्र येथे क्षेत्रीय कर्मचारी यांच्या लॉगिनद्वारे कार्ड निर्माण करून घेता येते यावानीसही प्रसिद्धी द्यावी. याशिवाय अंगीकृत रुग्णालयातील आरोग्यमित्र यांना Beneficiary Login द्वारे कार्ड निर्माण करण्याबाबत स्वतंत्रपणे सूचना देण्यात आल्या आहेत. या तिन्ही पध्दतीचा जास्तीत जास्त अवलंब केला जाईल याबाबत नियोजन करावे.

सदर विशेष मोहिमेची यशस्वी अमलबजावणी होण्याच्या दृष्टीने सोबत जोडलेल्या शासन प्रसिध्दी पत्राच्या अनुषंगाने जास्तीत जास्त जनजागृती करण्यात यावी.

सोबत - महाराष्ट्र शासन प्राप्त प्रसिध्दी माहिती नमुना

**(डॉ. प्रमोद पडवळ)**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत माहितीस्तव**
१.मा.अति-आयुक्त (सार्व.आ.वि), मिरा भाईंदर महानगरपालिका
२.मा.उपायुक्त (सार्व.आ.वि), मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner